## ळळीतें.

॥ ६५७२ ॥ कळस वाहियेला शिरीं । सहस्र नामें पूजा करीं ॥१॥ पीक पिकलें पिकलें । घन दाटूनियां आलें ॥ २ ॥ शेवटींचें दान । भागा आला नारायण ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोट । भरलें वारले बोभाट ॥ ४ ॥

॥ ६५७३ ॥ गलित झाली काया । हेंचि ळळीत पंढरीराया ॥ १ ॥ आलें अवसानापासीं । रूप राहिलें मानसीं ॥ २ ॥ वाहिला कळस । तेथें स्थिरावला रस ॥ ३ ॥ तुका म्हणे गोड झालें । नारायणीं पोट धालें ॥४॥

॥ ६५७४ ॥ बोलाचे गौरव । नव्हे माझा अनुभव ॥ १ ॥ माझी हरि-कथा माउली । नव्हे आणिकां पांगिली ॥ २ ॥ व्याली वाढविलें । निज-पदीं निजविलें ॥ २ ॥ दाटली रसें । त्रिभुवन ब्रम्हरसें ॥ ३ ॥ विष्णु जोडी कर । रज माथां वंदी हर ॥ ४ ॥ तुका म्हणे बळ । तोरडी हा कळी काळ ॥ ५ ॥

सप्तरात्री देव व भक्ता बरोबर क्रमून निर्याण काळ समीप आला असें पाहून इंद्रायणीच्या कांठीं भजन करीत चालले तेव्हां देवादि विमानांत बसून समारंभ पाहवयास आले.

॥ ६५७५ ॥ वाट वैकुंठीं पहाती । भक्त कैं पा येथें येती ॥ तयां जन्म मरणखंती । नाहीं चित्तीं परलोक ॥ १ ॥ धन्य धन्य हरीचे दास । तया सुलभ गर्भवास ॥ब्रह्मादिक करिती आस । तीर्थें वास भेटिची ॥ २ ॥ कथा श्रवण व्हावयास । यमधर्मा थोर आस ॥ पाहाती रात्रंदिवस । वाट कर जोडूनियां ॥ ३ ॥ रिद्धीसिद्धी न पाचारितां । सा धुंडिती हरिभक्तां ॥ मोक्ष-सायुज्यता । वाट पाहे भक्तांची ॥ ४ ॥ असती जेथें उभे ठेले । सदा प्रेम-सुखें धाले ॥ आणिकही उद्धरीले । महा दोषी चांडाळ ॥ ५ ॥ सकळ क-रिती त्यांची आस । सर्व भावें ते उदास ॥ धन्य भाग्य त्यांस । तुका ह्मणे दरुषणें ॥ ६ ॥

॥ ६५७६ ॥ नाहीं कांटाळलों परी वाटे भय । करावें तें काय न कळतां ॥ १ ॥ जनवन आम्हां समानचि झालें । काम क्रोध केले पाठमं

णी ॥२॥ षड् ऊर्मी शत्रु जिंकिलें अनंता । नामाचिया सत्ताबळें तुझ्या ॥३॥ मुख्य धर्म आह्मां सेवकांचा ऐसा । स्वामी करी शिरसा पाळावें तें ॥ ४ ॥ ह्मणऊनी तुका अवलोकोनी पाय । वचनाची पाहे वास एका ॥ ५ ॥

॥ ६५७७ ॥ आतां आवश्यक करणें समाधान । पाहिलें निर्वाण न पाहिजे ॥ १ ॥ केलें तरी आतां सुशोभ्य करावें । दिसतें बरवें संतांमधीं ॥ २ ॥ नाहीं भक्तराजीं ठेविला उद्धार । नामाचा आकार त्यांचियानें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझ्या वडिलांचें ठेवणें । गोप्य नारायणें न करावें ॥४॥

## प्रयाणापूर्वीं पंढरीनाथानीं तुकारामबावास प्रायश्चित घेण्यास सांगितलें.

॥ ६५७८ ॥ एक वेळ प्रायश्चित्त । केलें चित्त मुंडण ॥ १ ॥ अहंकार नांवें दोष । त्याचें ओस पाडिलें ॥ २ ॥ अनुतापें स्नानविधी । यज्ञसिद्धि देह होम ॥ ३ ॥ जीव शिवा होतां चुका । तेथें तुका विनटला ॥ ४ ॥

॥ ६५७९ ॥ झाली होती काया । बहुत मलीन पंढरीराया ॥ १ ॥ तुमच्या उजळली नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥ २ ॥ अनुतापें झाला झाडा प्रालब्धानें केला तोडा ॥३॥ तुका ह्मणे देह पायीं । ठेउनी झालों उतराई॥४॥

॥ ६५८० ॥ संसाराचे अंगीं अवघीं च व्यसनें । आह्मी या कीर्तनें शुद्ध झालों ॥ १ ॥ आतां हें सोंवळें झालें त्रिभुवन । विषम धोऊन सांडियेलें ॥ २ ॥ ब्रह्मपुरीं वास करणें अखंड । न देखिजे तोंड विटाळाचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मां एकांताचा वास । ब्रह्मीं ब्रम्हरस सेवूं सदा ॥ ४ ॥

## स्नानादि विधि सारल्या नंतर तुकारामबावांनीं देवास व पंचभूतांस आपआपले भाग विभागून देऊन देह निर्वाण केला.

॥ ६५८१ ॥ अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघीच दान दिली भूमि ॥ १ ॥ अवघाचि काळ दिनरात्र शुद्धी । साधियेली विधि पर्वकाळ ॥२॥ अवघेंच तीर्थ व्रतें केले योग । अवघेंचि तें सांग झालें कर्म ॥ ३ ॥ अवघेंचि फळ आलें आह्मा हातां । अवघेंचि अनंता समर्पिलें ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां बोलूं अबोलणें । कायावाचामनें उरलों नाहीं ॥ ५ ॥

॥ ६५८२ ॥ झाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥ १ ॥ रडती रात्रंदिवस कामक्रोधमाया । ह्मणती हायहाया यमधर्म ॥ २ ॥ वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि भरभरां जीवित्वेंसी ॥ ३ ॥ फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्य जनीं बोंब झाली ॥ ४ ॥ दिली तिळांजुळी कुळनामरूपांसी । शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ॥ ५ ॥ तुका ह्मणे रक्षा झाली आपींआप । उजळला दीप गुरुकृपा ॥ ६ ॥

॥ ६५८३ ॥ आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो झाला सोहळा अनुपम्य ॥ १ ॥ आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ॥ २ ॥ एकदेशीं होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ॥ ३ ॥ फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दुरी झालों ॥ ४ ॥ नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावुनियां ॥ ६ ॥

॥ ६५८४ ॥ बोळविला देह आपुलेनि हातें । हुताशिलीं भूतें ब्रह्माग्नीसीं ॥ १ ॥ एकवेळ झालें सकळ कारण । आतां नारायण नारायण ॥ २ ॥ अमृतसंजीवनी निवविली खाई । अंगें बये ठायीं हरपलीं ॥ ३ ॥ एकादशीविध जागरण उपवास । बारावा दिवस भोजनाचा ॥ ४ ॥ अवघीं कर्में झालीं घटस्फोटापाशीं । संबंध एकेसी उरला नामीं ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां आनंदीं आनंदु । गोविंदीं गोविंदु विस्तारला ॥ ६ ॥

॥ ६५८५ ॥ पिंडदान पिंड ठेविलें करून । तिळीं तिळवण मुळत्रयीं ॥ १ ॥ सारिले संकल्प एका चि वचनें । ब्रह्मीं ब्रम्हार्पण सेवटींच्या ॥ २ ॥ सव्य अपसव्य बुडालें हें कर्म । एका एक वर्म एकोविष्णु ॥ ३ ॥ पित्यापुत्रत्वाचें झालें अवसान । जनीं जनार्दन अभेदेंसी ॥ ४ ॥ आहे तैसी पूजा पावली सकळ । सहज तो काळ साधियेला ॥ ५ ॥ तुका ह्मणे केला अवघ्यांचा उद्धार । आतां नमस्कार सेवटींचा ॥ ६ ॥

॥ ६५८६ ॥ हातीं घेऊनियां काठी । तुका लागला कळिवरा पाठी ॥ १ ॥ नेऊनि निजविलें स्मशानीं । माणसें जाळी ते ठाकणीं ॥ २ ॥ काढिलें तें ओढें । मागील उपचाराचे पुढें ॥ ३ ॥ नाहीं वाटों आला भेव । सुख दुःख भोगिता देव ॥ ४ ॥ याजसाटीं हें निर्वाण । केलें कसियेलें मन ॥ ५ ॥ तुका ह्मणे अनुभव बरा । नाहीं तरी शास्त होय चोरा ॥ ६ ॥

॥ ६५८७ ॥ पिंड पदांवरी । दिला आपुलिया करीं ॥ १ ॥ माझें झालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ऋण ॥ २ ॥ केलें कर्मांतर । बोंब मारिली हरीहर ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें । भार उतरलें ओझें ॥ ४ ॥

अभिमानाचा त्याग करून देहाचें निरसन केल्यावर सर्वांच्या ऋणांतून मुक्त होऊन प्रतिज्ञा केली होती तिज प्रमाणें आपली काया ब्रह्म केली.

॥ ६५८८ ॥ शोधितांचि नये । म्हणोनि ओळंगितों पाय ॥ १ ॥ आतां दिसों नये जाणा । ऐसें करा नारायणा ॥ २ ॥ परतोनी मन । गेलें ठायींच मुरोन ॥ ३ ॥ विसरला तुका । बोलों चालों झाला मुका ॥ ४ ॥

॥ ६५८९ ॥ तान्हे तान्ह प्याली । भुक भुकेनें खादली ॥ १ ॥ जेथें तेंचि नाहीं झालें । झाडा घेतला विठ्ठलें ॥ २ ॥ वास वासनेसी नाहीं । मन पांगुळलें पायीं ॥ ३ ॥ शेष उरला तुका । जीवीं जीवा झाला चुका ॥ ४ ॥

॥ ६५९० ॥ रज्जु सर्पाकार । भासयेलें जगडंबर ॥ १ ॥ म्हणोनि आठवितों पाय । घेतों अलाय बलाय ॥ २ ॥ दृश्य द्रुमाकार लाणी । केलें सर्वस्वासी धणी ॥ ३ ॥ तुकीं तुकला तुका । विश्वीं भरोनी उरला लोकां ॥ ४ ॥

॥ ६५९१ ॥ म्हणवितों दास । परि मी असें उदास ॥ १ ॥ ह्याचि निश्चय माझा । परि मी निश्चयाहुनि दुजा ॥ २ ॥ सरतें कर्तृत्व माझ्यानें । परि मी साहीहूनी भिन्न ॥ ३ ॥ तुका तुकासी तुकला । तुका तुकाहुनि निराळा ॥ ४ ॥

॥ ६५९२ ॥ करावें तें काम । उगाच वाढवावा श्रम ॥ १ ॥ अवघें एकमय । राज्य बोलों चालों नये ॥ २ ॥ दुजयाची सत्ता । न चलेसी झाली आतां ॥ ३ ॥ आतां नाहीं तुका । पुनः हारपला लोकां ॥ ४ ॥

॥ ६५९३ ॥ जन्ममरणांची विसरलों चिंता । तूं माझा अनंता मायबाप ॥ १ ॥ होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय अनिवार निरासिलें ॥ २ ॥ लिगाडाचें मूळ होतीं पंचभूतें । सांचें त्यापुरतें विभागीलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे झाला प्रपंच पारिखा । जीवासी तूं सखा पांडुरंग ॥ ४ ॥

॥ ६५९४ ॥ एक वेळे केलें रितें कलेवरा । आंत दिला थारा पांडुरंगा ॥ १ ॥ पाळण पोषण न लागे ते सोई । देहाचे ते कांहीं सर्वभाव

। २॥ माझिया मरणें झाली हे वसती । लागली ते ज्योती अविनाश ॥ ३ ॥
ाला ऐसा एका घायें येथें नाहीं । तुका ऐसा कांहीं बोलों नये ॥ ४ ॥

॥ ६५९५ ॥ नभोंमय झालें जळ । एकी सकळ हरपलें ॥ १ ॥ आतां
काय सारासारी । त्यांच्या लहरी तयांत ॥ २ ॥ कैंचा तेथें यावा सांडी ।
आप कोंडी आपणां ॥ ३ ॥ तुका ह्मणे कल्प झाला । अस्त गेला उ-
दयीं ॥ ४ ॥

॥ ६५९६ ॥ कोणापाशीं द्यावें माप । आपींआप राहिलें ॥ १ ॥
कासयाची भरोवरी । काय दुरी जवळी ॥ २ ॥ एकें दाखविले दाहा । फां-
टा पाहा पुसुनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सरलें ओझें । आतां माझें सकळ ॥ ४ ॥

॥ ६५९७ ॥ पदोपदीं दिल्हें आंग । झालें सांग कारण ॥ १ ॥ रुधवु-
नी ठेलों ठाव । जागा वाव सकळ ॥ २ ॥ पुढती चाली मना लाहो । वाढे
देहो संतोष ॥ ३ ॥ तुका म्हणे क्षर भागीं । झालों जगीं व्यापक ॥ ४ ॥

॥ ६५९८ ॥ ठाकिलें काळा मारिली दडी । दिल्ही कुडी टाकोनियां
॥ १ ॥ पांघरलों बहु काळें । घोंगडें बळें सांडवलें ॥ २ ॥ नये ऐसा लाग-
वरी । परतें दुरी लपालें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आड सेवा । लाविली हेवा
धांदली ॥ ४ ॥

॥ ६६९९ ॥ आनंदाचे डोहीं आनंदतरंग ॥ आनंदचि अंग
आनंदाचें ॥ १ ॥ काय सांगों झालें कांहिंचिया बाहीं । पुढें चाली नाहीं
आवडीनें ॥ २ ॥ गर्भाच्या आवडी मातेचा डोहळा । तेथिंचा जिव्हाळा
तेथें बिंबे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा
आला ॥ ४ ॥

॥ ६६०० ॥ पाणी पात्र दिगंबरा । हस्त करा सारिखे ॥ १ ॥ अव-
श्यक देव मनीं । चिंतनींच सादर ॥ २ ॥ भिक्षा कामधेनू ऐसी । अवकाशीं
शयन ॥ ३ ॥ पांघरून तुका दिशा । केला वास अलक्षीं ॥ ४ ॥

तुकारामबावा आपल्या सामर्थ्यानें देहनिरसन करून तत्वीं लीन झाले असतां देवानें ध्यान करून हृदयामध्यें चिंतनाचें ठायीं अनुसंधान लावून त्यांस प्रगट केलें.

॥ ६६०१ ॥ इच्छेपासी आलों फिरोनी मागुता । स्वामी सेवकता अवडीची ॥ १ ॥ द्यावें लवकरी मागितलें दान । मुळीचें जतन करुनि असें ॥ २ ॥ उपायें हे करीं एकाचि वचना । दावूनियां खुणा ठाया येतों ॥ ३ ॥ तुका ह्मणे गांठी किती तुजपाशीं । जगाच्या लोंडिसी चिंतनानें ॥४॥

॥ ६६०२ ॥ जळो माझी तैसी बुद्धि । मज घाली तुजमधीं ॥ आवडी दे विधि । निषेधींच चांगली ॥ १ ॥ तूं स्वामी मी सेवक । उंच नीच पद एक ॥ऐसें करावें कौतुक । नको धरूं खंडणा ॥ २ ॥ रत्न शोभलें कोंदणें । अलंकारीं मिरवे सोनें ॥ एक असतां तेणें । दुजें केंवीं जाणावें ॥ ३ ॥ जळें न खाती जळां । वृक्ष आपुलिया फळां ॥ भोगिता निराळा । त्याने गोडी निवडिली ॥ ४ ॥ उष्णें छाये सुख वाटे । बाळें माते पान्हा लोटे ॥ एका एक भेटे । कोण सुख ते काळीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे हित । हेंचि मानी माझें चित्त ॥ नव्हे आतां मुक्त । ऐसा झाला भरंवसा ॥ ६ ॥

॥ ६६०३ ॥ वृत्तीवरी येणें आम्हा कशासाठीं ॥ एवढी आटी सोसावया ॥ १ ॥ जाणतसां परी नेणते जी देवा । भ्रमचि बरवा राखावा तो ॥ २ ॥ मोडुनि भरलों अभेदाची मूस । तुम्हां कां आळस ओढवला ॥ ३ ॥ तुका म्हणे होईं लवकरी उदार । लांबणीचें फार काम नाहीं ॥ ४ ॥

याप्रमाणें तुकारामबावांस प्रगट केल्यावर विष्णु ह्मणाले आतां वैकुंठास चलावें तेव्हां समागमें घालवीत आले होते त्यांकडे कृपादृष्टीनें अवलोकन करून वैकुंठास जावयास निघाले तेव्हां हे अभंग बोलले.

॥ ६६०४ ॥ वाजतील तुरें । येणें आनंदें गजरें ॥ १ ॥ जिंकोनियां अहंकार । पावठणी केलें शीर ॥ २ ॥ काळा नाहीं वाव । परा श्रमा कोठें ठाव ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां। सोपें वैकुंठासी जातां ॥ ४ ॥

॥ ६६०५ ॥ चालिले न वाटे । गाऊनियां जातां वाटे ॥ १ ॥ बरवा वैष्णवांचा संग । येतो सामोरा श्रीरंग ॥ २ ॥ नाहीं भय आड । कांहीं विषमांचें जड ॥ ३ ॥ तुका म्हणे भक्ति । सुखरूप आदी अंतीं ॥ ४ ॥

मग तुकारामबावा देवांस ह्मणालें कीं आतां सत्वर प्रयाण करावें. हें ऐकून देव व भक्त यांनीं त्यांचें फार स्तवन केलें. त्या समयीं रामेश्वरभट्टानें म्हटलेला अभंग.

॥ ६६०६ ॥ भक्त भागवत जीवन्मुक्त संत । महिमा अत्यद्भुत चराचरीं ॥ १ ॥ ऐसिया अनंतामाजि तूं अनंत । लिलावेश होत जगत्राता ॥ २ ॥ ब्रह्मानंद तुकें तुळे आला तुका । तो हा विश्वसखा क्रीडे जनीं ॥ ३ ॥ शास्त्रां शिष्टाचारा अविरुद्ध क्रिया । तुझी भक्तराया देखियेली ॥ ४ ॥ देऊनि तिळांजुळी काम्य निषिद्धांसीं । विधिविणें योगेशीं ब्रह्मार्पण ॥ ५ ॥ संत गृहमेळीं जगधंद्या गिळी । पैल उदयाचळीं भानु तुका ॥ ६ ॥ संत वृंदें तीर्थ गौतमी हरिकथा । तुकया नर सिंहस्ता भेटों आलीं ॥ ७ ॥ शांति पतिव्रते झाले परि नयन । काम संतर्पण निष्कामता ॥ ८ ॥ क्षमा क्षमापणें प्रसिद्ध पृथा जगीं । तें तों तुझ्या आंगी मूर्तिमंत ॥ ९ ॥ दया दिनानाथा तुवां जिववीली । विश्वीं विस्तारली कीर्ति तुझी ॥१० ॥ वेदवाक्यबाहु उभारिला ध्वज । पूजिले देव द्विज सर्व भूतें ॥ ११ ॥ अधर्म क्षय व्याधि धर्मांशीं स्पर्शला । तो त्वां उपचारिला अनन्य भक्ति ॥ १२ ॥ ब्रह्म ऐक्यभावें भक्ति विस्तारिली । वाक्यें सफल केलीं वेदाविहितें ॥ १३ ॥ देहबुद्धि जासा अभिमानें वंचिलों । तो मी उपेक्षिलों न पाहिजे ॥ १४ ॥ न घडो याचे पायीं बुद्धीचा व्यभिचार । मागे रामेश्वर रामचंद्र ॥ १५ ॥

ऐसी संतांची स्तुती ऐकुन अहंकृति उत्पन्न होईल व तेणें करून देवाजीचे पाय अंतरतील असें तुकारामबावा ह्मणाले.

॥ ६६०७ ॥ न करावी स्तुति माझी संतजनीं । होईल या वचनीं अभिमान ॥ १ ॥ भारें भवनदी न उतरें पार । दुरावती दूर तुमचे पाय ॥ २ ॥ तुका ह्मणे गर्वें पुरविली पाठी । होईल माझ्या तुटी विठोबासी ॥ ३ ॥

## या प्रसंगीं आपल्या समागमी जनांस आलिंगन देऊन तुकारामबावांनीं उपदेश केला.

॥ ६६०८ ॥ ऐका ऐका भाविकजन । कोण कोण व्हाल ते ॥ १ ॥ तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ॥ २ ॥ नका शोधूं मतांतरें नुमगें खरें बुडाल ॥ ३ ॥ कलीमध्यें दास तुका । जातो लोकां सांगत ॥ ४ ॥

## तुकारामबावांची शेवटील विनवणी.

॥ ६६०९ ॥ सखे सज्जन हो स्मरा नारायण । संगें येतें कोण सत्य सांगा ॥ १ ॥ आमुचे गांवींचें जरी रत्न गेलें । नाहीं सांगितलें म्हणों नये ॥ २ ॥ म्हणोनि सकळां केलें जरी ठावें । नाईकलें जावें पुण्यवाटे ॥ ३ ॥ इतुकियावरी तुह्मी राहों नका । विनवितो तुका विठोबासी ॥ ४ ॥

॥ ६६१० ॥ माहेरींचा मज आलासे मुळारी । उद्यां प्रातःकाळीं जाणें मज ॥ १ ॥ बहूकाळ माझा केलासे सांभाळ । पांडुरंगें मूळ पाठविलें ॥ २ ॥ हीच आह्मा भेटी लोभ असों द्यावा । पुन्हा मी केशवा नये येथें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहू न बोलों उत्तर । दया आतां फार असों द्यावी ॥ ४ ॥

॥ ६६११ ॥ सकळही माझी बोळवण करा । परतोन घरा जावें तुह्मी ॥ १ ॥ कर्म धर्म तुम्हां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशिर्वाद ॥२॥ वाढवूनी दिलें एकाचिये हातीं । सकळ निश्चिती झाली येथें ॥ ४ ॥ आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । मी माझीया भावें अनुसरलों ॥ ४ ॥ वाढवितां लोभ होइल उशिर । अवघींच स्थिर करा ठायीं ॥ ५ ॥ धर्म अर्थ काम झाले एक ठायीं । मेळविला तींहीं हाता हात ॥ ६ ॥ तुका ह्मणे आतां झाली याची भेटी । उरल्या सा गोष्टी बोलावया ॥ ७ ॥

॥ ६६१२ ॥ चार लक्ष तीस हजार हीं पदें । तुह्मासी विषदें सांगितलीं ॥ १ ॥ पुन्हा नरतनु मिळणार नाहीं । ह्मणोनि या देहीं भव तरा ॥ २ ॥ सर्वांच्या चरणीं मस्तक ठेवितों । आह्मी आतां जातों निज धामा ॥ ३ ॥ सर्वत्र मिळोनि विनंति हे ऐका । भजनीं करूं नका आळस कोणी ॥ ४ ॥

पोटाचिये साठीं चिंता न करावी । देईल गोसावी अलबेले ॥ ५ ॥ मन हें तुमचें अधीर हें आहे । ह्मणोनि यां बाहे चिंता बहु ॥ ६ ॥ राजा जनालागीं चाकर ठेवितो । पोटालागीं देतो किंवा नाहीं ॥ ७ ॥ म्हणोनि देवासी साधावें विचारें । देईल निर्धारें अन्न बहु ॥ ८ ॥ पोटासाठीं इतुकी हळहळ लागली । कैसी भ्रांती आली देवाविशीं ॥ ९ ॥ तुका ह्मणे माझ्या गळ्याची हे आण । जरी नारायण विसराल ॥ १० ॥

॥ ६६१३ ॥ उठा सकळिक भेटूं तुह्मी आम्ही । लक्ष लावा नामीं विठोबाच्या ॥ १ ॥ लहानथोर सारे आशिर्वाद द्यारे । बोळवित यारे इंद्रायणी ॥ २ ॥ येथुनी आमुचा खुंटलासे मार्ग । तुम्ही कृपा लोभ असूं द्यावा ॥ ३ ॥ तुम्हासाठीं जीव झाला कासावीस । कोणी हरिचे दास निवडाना ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां जाईल हीच भेटी । राहातील त्या गोष्टी बोलावया ॥ ५ ॥

॥ ६६१४ ॥ येतों काकुळती अर्थ धरा चित्तीं । आमचीये पंथीं हेत धरा ॥ १ ॥ आमुच्या पंथें नाहीं जकातिचें नातें । सणद आलिया पंथें कोण दंडी ॥२॥ असें मी सांगतों बरें धरा मनीं । अनहिताचें कोणी सांगत नाहीं ॥३॥ परिहारासाठीं वैद्य नारायण । औषध आपुला गुण करितसे ॥४॥

॥ ६६१५ ॥ रानोवनीं नाम दाटलें अपार । प्रेमाचें नीर वरुषला ॥ १ ॥ तेव्हां माझें रूप स्वरुपीं मिनलें । धन्य धन्य केलें तिहीं लोकीं ॥ २ ॥ तुझिये कितींचा वाजविला डंका । एकलाचि तुका घालविला ॥ ३ ॥

॥ ६६१६ ॥ तुम्हां सांगावया मूळ हें कारण । वैकुंठाहून आलों आम्ही ॥१॥ कलीमध्यें झाल्या पापाचिया राशी । म्हणूनि आम्हांसीं पाठविलें ॥ २ ॥ नाम गर्जुनियां पाप जाळावया । जडजीव उद्धाराया कलीमाजी ॥ ३ ॥ माझिया बोलाचा मानाल जरी शीण । भोगाल पतन यमपुरीं ॥ ४ ॥ म्हणोनीयां तुम्हां येतों काकुळती । नाम धरा चित्तीं विठोबाचें ॥ ५ ॥ तुमचीं हीं पापें जातील निरसुनी । हें तुम्हां सांगोनी जाइल तुका ॥ ६ ॥

॥ ६६१७ ॥ मज वाटे खंती आतां वैकुंठिची । पूर्ण संसाराची आशा झाली ॥ १ ॥ श्रीरंग सांवळा आहे वैकुंठासी । धर्म हृषीकेशी राज्य करी ॥ २ ॥ तें सुख आठवितां झालें समाधान । आतां नाहीं येणें संसारासी ॥ ३ ॥ आतां ऐका आम्ही सांडूं मृत्युलोक । हें तुम्हा कवतुक कळेल पुढें ॥ ४ ॥ तुका म्हणे माझी वाट तुम्ही पहातां । दग्धलों संसारी म्हणोनियां ॥ ५ ॥

॥ ६६१८ ॥ कुडीसहित तुका जाईल वैकुंठासी । तें गुज तुम्हासी कळलें नाहीं ॥ १ ॥ पुढें जें होईल तें जाणें विठ्ठल । लौकिकां कळेल काय तेथें ॥ २ ॥ तुका म्हणे आतां काया ब्रम्ह झाली । विमानें उतरलीं आम्हा लागीं ॥ ३ ॥

॥ ६६१९ ॥ उठा एक आतां सांगतों तुम्हाला । देशनटा आला आम्हालागीं ॥ १ ॥ इंद्रायणीवरी उतरलीं विमानें । आम्हापासीं आले विष्णुदूत ॥ २ ॥ मृत्युलोकीं माझें पूर्ण झालें मन । गाईलें कीर्तन विठोबाचें ॥ ३ ॥ साधुसंतां पायीं गेलों लोटांगणीं । नित्य गर्जे वाणी विठ्ठलनामें ॥ ४ ॥ आतां एक ऐका सांगतों तुम्हासी । जावें पंढरीसी सर्व काळ ॥ ५ ॥ तुम्ही कोणी करा हरिनामकीर्तन । ऐसें तुम्हा सांगोन जातो तुका ॥ ६ ॥

॥ ६६२० ॥ बैसा आतां आमचा राम राम घ्यावा । आम्ही गेलों देवा शरणांगत ॥ १ ॥ शरणांगत जातां ब्रम्ह झाली काया । गेल्या नासोनियां पापराशी ॥ २ ॥ तुमची आमची तुटी झाली येथोनी । तुम्ही स्मरा वाणी रामराम ॥ ३ ॥ नामें करो विठ्ठल दूर अंतरला । भावें हा वळला पांडुरंग ॥ ४ ॥ निरपेक्ष निरभिमानी असती जे प्राणी । त्यांसी चक्रपाणी जवळी आहे ॥ ५ ॥ ज्यांचा भाव जडला विठोबाचे पायीं । त्यांसी मुक्ति देई पांडुरंग ॥ ६ ॥ ज्ञान अभिमान अंगीं भरला ताठा । देवासी करंटा दुरावला ॥ ७ ॥ ज्ञानाचा अभिमान सांडा म्हणे तुका । तरीं जोडेल सखा पांडुरंग ॥ ८ ॥

॥ ६६२१ ॥ पताकांचें भार मृदंगाचे घोष । जाती हरिचे दास पंढरिसी ॥ १ ॥ लोकांची पंढरी आहे भूमीवरी । आम्हा जाणें दुरी वैकुंठासी ॥ २ ॥ कांहीं केल्या तुम्हा उमजेना वाट । म्हणुनी बोभाट करुनी जातों ॥ ३ ॥ मग पुढें रडाल कराल आरोळी । तुका कदाकाळीं मागें नये ॥ ४ ॥

॥ ६६२२ ॥ ऐसिये अवघड आमुची आहे वाट । नाहीं घाटनीट वाटेवरी ॥ १ ॥ जकातीचा गुंता नाहीं वाटेवरी । मार्ग मोकळे वरें यावें जावें ॥ २ ॥ ऐसें ज्या भोगणें असेल हें सुख । तेणें हो विन्मुख होऊं नये ॥ ३ ॥ मग पडाल संकटीं भवसागरीं शोका । कोणे जन्मीं तुका सांपडेना ॥ ४ ॥

॥ ६६२३ ॥ बसारे गड्यानों आज्ञा द्यावी आह्मा । आमुच्या रामनामा चित्तीं धरा ॥ १ ॥ उपकार करा पतीत उद्धरा । वारंवार उच्चारा रामनाम

॥ २ ॥ व्हारे वारकरी वेगीं जा पंढरी । निरोप महाद्वारीं एवढा सांगा ॥ ३ ॥ तुका आमुचे गांवीं होता एक आपुला । नाहीं कोठें गेला पायाविणें ॥ ४ ॥

॥ ६६२४ ॥ गेलियाची हळहळ कोणी । नका मनीं धरूं कांहीं ॥ १ ॥ पावलें तें म्हणों देवा । सहज सेवा या नांव ॥ २ ॥ जळतां अंगीं पडतां प्राण । नारायण भोगितां ॥ ३ ॥ तुका ह्मणे नलगे मोल । देव बोल आवडती ॥ ४ ॥

॥ ६६२५ ॥ वसा सर्वजन तुह्मी कृपा करा । सत्य मार्ग धरा आपुलाला ॥ १ ॥ माझा मार्ग नाहीं फुटणार कोणा । सद्भाववासना धरों नेदी ॥ २ ॥ पेरियेलें बीज विस्तारे मागुती । मग करा खंती निःकार्याची ॥ ३ ॥ उन्हाळीं पर्जन्य वर्षे शीळधारी । काय आह्मावरी उपकार ॥ ४ ॥ समय उचित कोणी सावधान । होतो राज्यमान तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ६६२६ ॥ विमानांचे घोष वाजती असंख्य । सुरु झाला डंका वैकुंठींचा ॥ १ ॥ शब्दांचा विश्वास झाली आठवण । करा वोळवण सज्जन हो ॥ २ ॥ आले विष्णुदूत तेचि प्रेममूर्ति । अवसान हातीं सांपडलें ॥ ३ ॥ झाला पाठमोरा इंद्रायणीतळीं । रामघोषटाळी वाजविली ॥ ४ ॥ प्रथम तो पाय घातला पाण्यांत । राहिली ते मात तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६६२७ ॥ माझ्यावरुतें पांजलें हें शरीर । झाला धुंदुकार दाही दिशा ॥ १ ॥ टाळ घोळ विणा मृदंगाचे घोष । गाती हरिदास नाचताती ॥ २ ॥ नेणों मागें पुढें होती हरिकथा । पहातां पहातां भ्रम लोकां ॥ ३ ॥ हातावरी हात मारुनि जातो तुका । परी कोणा एका उमजेना ॥ ४ ॥

॥ ६६२८ ॥ कंठ आणि उर झाले ते जीवन । परतलें मन मागुतें कीं ॥ १ ॥ जनीं जनार्दन आहे तुम्हापाशीं । व्यर्थ उपवाशी होती जीव ॥ २ ॥ इतुक्यांत एक येत पाठीवरी । कीर्ति हे माघारी जागवित ॥ ३ ॥ कांहीं केल्या याचें द्रवेना तें मन । केवळ पाषाण दिसतसे ॥ ४ ॥ सहस्रांत एक निवडीतां शूर । जागे तरुवर बरे होते ॥ ५ ॥ काढुनि डोईचा लोंव लावी शेला । असेल आपुला यावें कोणी ॥ ६ ॥ तुका म्हणे किती फोडावे या उर । करी परिहार आपुला तो ॥ ७ ॥

॥ ६६२९ ॥ सर्व हेत झाला एक आहे मनीं । ऐका विनवणी तुह्मी संत ॥ १ ॥ आह्मी संतलोकीं ह्मी ही मृत्यूलोकीं ॥ कोण घरा एकी सुपंथ हा ॥ २ ॥ ठायींची अचपळ तोंड फटकळ । सोसा वरदळ मजसाठीं ॥ ३ ॥

इचा उपकार आह्मावरी झाला । पदर दिधला माळणीला ॥ ४ ॥ अहो पांडुरंगा फेडा इचें ऋण । संबंध तोडणें इचा माझा ॥ ५ ॥ बाकी देऊनियां तुका मार्गी झाला । पदर दिधला माळणीस ॥ ६ ॥

॥ ६६३० ॥ आमुची ही कांता तुमचे पदरीं । दया तिजवरी करावी ते ॥ १ ॥ आहे अचपळ तोंडें फटकळ । सोसा वरदळ मज साठीं ॥ २ ॥ पसरीं पदर धरीं दाढी होंटी । घालवे जी पाठीं अपराध ॥ ३ ॥ इतुक्या शब्दांचा खरा हेत धरा । उपकार करा मजवरी ॥ ४ ॥ तुका म्हणे नेणें बोलणें मी फार । करा अंगिकार तुह्मी आतां ॥ ५ ॥

॥ ६६३१ ॥ आह्मी जातों आपुल्या गावां । आमुचा रामराम घ्यावा ॥ १ ॥ तुमची आमची हेचि भेटी । येथूनियां जन्मतुटी ॥ २ ॥ आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥ ३ ॥ येतां निजधामीं कोणी । विठ्ठलविठ्ठल बोला वाणी ॥ ४ ॥ रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥ ५ ॥

॥ ६६३२ ॥ घरचीं दारचीं भजा पांडुरंगा । वडिलांसी सांगा दंडवत ॥ १ ॥ मधाचिये गोडी माशी टाकी उडी । मोडलिया घडी पुन्हा नये ॥ २ ॥ गंगेचा हा ओघ सागरीं मिळाला । नाहीं मागें आला कदा काळीं । ऐशीया शब्दांची बरी करा सोय । गेला तुका नये मागुता तो ॥ ४ ॥

॥ ६६३३ ॥ लोकांची पंढरी आहे भुमीवरी । आह्मा जाणें दुरी वैकुंठासी ॥१॥ कांहीं केल्या तुम्हां उमगेना वाट । म्हणोनी बोभाट करी तसे ॥ २॥ माघारे रडाल कराल आरोळी । तुका कदा काळीं मागुता नये ॥३॥

॥ ६६३४ ॥ निरोप दिल्यावरी न पहावें मागुतें । पुढील तो पंथ उरकावया ॥ १ ॥ थोड्यासाठीं मागें ठेऊं नये घोर । आपुलें परिहार करावें तें ॥२॥ पोट भरल्यावर न बोलाव्या गोष्टी । भ्रम अन्न पोटीं घेऊं नये ॥ ३॥ देवाज्ञा झालीया न ठेवावी वासना । रांडा पोरें जाणा निरवूं नये ॥ ४ ॥ तुका ह्मणे देवें मार्ग शुद्ध केला । वांटा तो आपुला आला हाता ॥ ५ ॥

॥ ६६३५ ॥ झालें परब्रह्म घोंग्याखालीं शून्य । राहीलें बोलणें येथोनियां ॥ १ ॥ एकांतीं बोललों परिहारासाठीं । नामयाची बाकी फेडियेली ॥ २ ॥ बरा मी भाग्याचा ऋणी श्रीदेवाचा । वदविली वाचा तेणें माझी ॥ ३ ॥ एवढे ऋणानें माझें काम झालें । आतां हरपला भवभ्रम ॥ ४ ॥ व्याज हें मुद्दल आलें तुझे हातां । नाहीं भय चिंता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६६३६ ॥ शालिवाहन शकें पंधराशें एकाहत्तर । विरोधीनाम संवत्सर उत्तरायणीं ॥ फाल्गुन वद्य द्वितिया दिवस सोमवार । प्रथम प्रहर प्रातःकाळ ॥ १ ॥ तये दिवशीं शेवट कीर्तन करितां । ह्मणे मज आतां निरोप द्यावा ॥ २ ॥ तुका ह्मणे नमन साधुसंत पाया । ऐसें बोलोनियां गुप्त झाले ॥ ३ ॥

---

इतकें बोलून तुकारामबावा देवांसमागमें देहासहित वैकुंठास गेले तेव्हां समागमें घालवीत गेले होते ते ह्मणाले कोणी देह वैकुंठीं नेला होता काय? कोणी म्हणाले डोहांत गेले असतील कोणी ह्मणाले भागिरथींत देह टाकला असेल, इतक्यांत हातींच्या टाळासी गोंवलेलें पत्र वरून पडलें.

---

॥ ६६३७ ॥ आह्मी जातों तुह्मी कृपा असों द्यावी । सकळां सांगावी विनती माझी ॥ १ ॥ वाढवेळ झाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥ २ ॥ अंतकाळीं विठो आह्मासी पावला । कुडीसहित झाला तुका गुप्त ॥ ३ ॥

॥ ६६३८ ॥ तुका उतरला तुकीं । नवल झालें तिहीं लोकीं ॥ १ ॥ नित्य करितों कीर्तन । हेंचि त्याचें अनुष्टान ॥ २ ॥ तुका बैसला विमानीं । संत पाहती लोचनीं ॥ २ ॥ देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासी गेला ॥ ४ ॥

॥ ६६३९ ॥ मरणाहातीं सुटली काया । विचारा या निश्चयें ॥ १ ॥ नासुनियां गेली खंती । सहज स्थिती भोगाची ॥ २ ॥ न देखेसें झालें तम । आलें वर्म हातासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कैंची कीव । कोठें जीव निराळा ॥ ४ ॥

॥ ६६४० ॥ हरिनामाचें करुनी तारूं । भवसिंधु पारु उतरलों ॥ १ ॥ फावलें-फावलें आतां । पायीं संतां विनटलों ॥ २ ॥ हरिनामाचा छत्र घोडा । संवसार माढा छेदिला ॥ ३ ॥ हरिनामाचें करुनी धनुष्यकांड ।

विन्मुख तोंडें कळिकाळ ॥ ४ ॥ येणेंचि बळें सरते आह्मी । हरिचे नामीं लोकीं तिहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे झालों साचे । श्रीविठ्ठलाचे डिंगर ॥ ५ ॥

॥ ६६४१ ॥ लक्ष्मिसहित उतरलीं विमानें । येउनी दिलें ठाणें इंद्रायणीं ॥ १ ॥ आंतणीं असतां आलें बोलावणें । समस्तां कारणें सांगितलें ॥ २ ॥ करीत कीर्तन चालिले तेथुनी । गर्जत नामध्वनी विठोबाची ॥ ३ ॥ ब्रह्मा विष्णु रुद्र आले तिघेजण । घेतलें उचलून विमानांत ॥ ४ ॥ तुमच्या तें नेत्रीं झांपड पडली । विमानें चाललीं आकाशपंथें ॥ ५ ॥ ब्रह्मा विष्णु रुद्र तिघांसीं भेटलों । चरणासीं लागलों आवडिनें ॥ ६ ॥ चौकोशांवरीं थांबविलीं विमानें । पत्र हें तेथून तुम्हां लिहिलें ॥ ७ ॥ धन्य झाला तुका नामें उद्धरला । कुळी सहित गेला वैकुंठासी ॥ ८ ॥

॥ ६६४२ ॥ वाराणसी पर्यंत असों सुखरूप । सांगावा निरोप संतांसी हा ॥ १ ॥ येथुनियां आह्मां जाणें निजधामा । सवें असे आह्मां गरुड हा ॥ २ ॥ कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातसों माहेरीं तुका ह्मणे ॥ ३ ॥

---

तें पत्र वाचून सकळ समाधान पावून स्नान करून श्रीच्या देवळीं येऊन विठोबास नमून आपल्या घरीं गेले. परंतु कान्होबा, जिजाबाई, महादेव, विठोबा हीं चौघेजणें देवळात बसून देवाशीं भांडूं लागलीं तेव्हां देवानें गरुडास तुकारामबावाकडें पाठविलें. गरुडानें वैकुंठीं पाहून, शेषशयनीं जाऊन तुकारामबावांस वृत्तांत सांगितला. तेव्हां तुकारामबावांनीं पत्र लिहून दिलें तें गरुडानें आणून कान्हयापाशीं दिलें ते अभंग.

---

॥ ६६४३ ॥ न देखिजे ऐसें केलें । या विठ्ठलें दुःखासी ॥ १ ॥ कृपेचिये सिंहासनीं । अधिष्ठानीं बैसविलें ॥ २ ॥ वाजतां तो नलगे वारा । क्षीरसागरा शयनीं ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघेठायीं । मज पायीं राखिलें ॥ ४ ॥

॥ ६६४४ ॥ आतां येणेंविण नाहीं मज चाड । कोण वडबड करी
यां ॥ १ ॥ सुख तेंचि दुःख पुण्य पाप खरें । हें तों आम्हां बरें कळों
आलें ॥ २ ॥ तुका म्हणे वाचा वाहिली अनंता । बोलायाचें आतां काम
नाहीं ॥ ३ ॥

---

ऐसें हें पत्र कान्हयानें वाचून जिजाई महादेव व विठोबा
यांस समजाविलें तेव्हां अवघीं परमानंदें विठोबास
नमून आपल्या स्थळास गेलीं.

---

## तुकारामबावा वैकुंठास गेल्यानंतर पंढरीनाथानें शोक केला.

---

॥ ६६४५ ॥ दुःखाचें हें आसूं आलें असे डोळां । मनीं कळवळा कोण
जाणे ॥ १ ॥ काळवेळ चंद्र कोपला कां हरी । चित्त भक्तीवरी ठेऊं नेदी
॥ २ ॥ पडतां हा विंदु दुःख झालें चित्तीं । एवढी कां खंती कारितसां ॥ ३ ॥
कोणें तुझा भक्त नेला हा हातींचा । कां केश नासींचा उपडिला ॥ ४ ॥
मग पुन्हा बोले रुक्मिणीचा वर । नाहीं मज थार वैसावया ॥ ५ ॥ न बोलें
मी कांहीं असत्य बोलणें । सखा माझा म्हणे तुका जाण ॥ ६ ॥

॥ ६६४६ ॥ माझा प्रेमाचा पुतळा । तुका टाकोनियां गेला ॥ १ ॥
माझ्या जिवीं त्याचा छंद । पांडुरंग रडे फुंदे ॥ २ ॥ काय सांगों तुज गो-
ष्टी । दुःख न माये तें पोटीं ॥ ३ ॥ म्हणे रुक्मिणीचा कांत । माझें संबो-
खावें चित्त ॥ ४ ॥ सर्व गुणांतील गोड । तुका लावण्याचें झाड ॥ ५ ॥

॥ ६६४७ ॥ सर्व बोधांतील बोध । तुका पंचम तो वेद ॥ १ ॥ कैसा
असीं गुप्त ठेला । नेणों वारापाणी झाला ॥ २ ॥ हरी म्हणे वो रुक्मिणी ।
दावा आणुनियां कोणी ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐका । सांगों वैकुंठनायका ॥ ४ ॥

॥ ६६४८ ॥ भक्ति आनंदानें केली । माझी कल्पना निमाली ॥ १ ॥
नेलें अंतर खोलुनी । प्रेम प्यालासे धुवोनी ॥ २ ॥ माझें देह रंगशीळा । नाहीं
गेला कळीकाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी भला । नेणों देह सर्व गेला ॥ ४ ॥

॥ ६६४९ ॥ वाट पाहे दाहीं वाटे । तुका दिसों नेदी कोठें ॥ १ ॥ ऐसें कैसें
मज केलें । सर्व सुख दुःख नेलें ॥ २ ॥ त्याही सुखें सुखावला । मोठा घात
माझा केला ॥ ३ ॥ तुका म्हणे तेंचि धन । दीन दुबळ्याचे प्राण ॥ ४ ॥

---

# तुकारामबावानीं लोकांस नित्यपाठासाठीं स्वर्गाहून पाठविलेले अभंग.

॥ ६६५० ॥ जन्माचें तें मूळ पाहिलें शोधून । दुःखासी कारण जन्म घ्यावा ॥ १ ॥ पापपुण्य करुनी जन्मा येतो प्राणी । नरदेही येऊनी हानी केली ॥ २ ॥ रजतमसत्व आहे ज्याचे अंगीं । याचगुणें जगीं वायां गेला ॥ ३ ॥ तम म्हणजे काय नर्कचि केवळ । रज तो सबळ मायाजाळ ॥ ४ ॥ तुका म्हणे येथें सत्याचें सामर्थ्य । करावा परमार्थ अहर्निशी ॥ ५ ॥

॥ ६६५१ ॥ अहर्निशी सदा परमार्थ करावा । पाय न ठेवावा आड मार्गीं ॥ १ ॥ आड मार्गीं कोणी जन जे जातील । त्यांतून काढील तोचि ज्ञानी ॥ २ ॥ तोचि ज्ञानी खरा तारी दुर्जीयासी । वेळोवेळां त्यासी शरण जावें ॥ ३ ॥ आपण तरेल नव्हे तें नवल । कुळें उद्धरील सर्वांचीं तो ॥ ४ ॥ शरण गेलीयानें काय होतें फळ। तुका ह्मणे कुळ उद्धरिलें ॥ ५ ॥

॥ ६६५२ ॥ उद्धरिलें कूळ आपण तरला । तोचि एक झाला त्रैलोक्यांत ॥ १ ॥ त्रैलोक्यांत झालें द्वैतचि निमालें । ऐसें साधियेलें साधन बरवें ॥ २ ॥ बरवें साधन सुखशांती मना । क्रोध नाहीं जाणा तीळभरी ॥ ३ ॥ तीळभरी नाहीं चित्तासि तो मळ। तुका ह्मणे जळ गंगेचें तें ॥ ४ ॥

॥ ६६५३ ॥ जैसी गंगा वाहे तैसें त्याचें मन । भगवंत जाण त्याचे जवळी ॥ १ ॥ त्याचे जवळी देव भक्तिभावें उभा । आनंदाचा गाभा तया दिसे ॥ २ ॥ तया दिसे रूप अंगुष्ठप्रमाण । अनुभवी खूण जाणती हे ॥ ३ ॥ जाणती हे खुण स्वात्मअनुभवी । तुका ह्मणे पदवी ज्याची त्याला ॥ ४ ॥

॥ ६६५४ ॥ ज्याची त्याला पदवी इतरां न साजे । संतांला उमजे आत्मसुख ॥ १ ॥ आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी । यावीण चावटी करूं नका ॥२॥ करूं नका कांहीं संतसंग धरा । पुर्वींचा जो दोरा उगवला ॥३॥ उगवेल प्रारब्ध संतसंगें करूनि । प्रत्यक्ष पुराणीं वर्णियेले ॥ ४ ॥ वर्णियेलें एका गुणनामघोषें । जातीलरे दोष तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६६५५ ॥ दोषरे जातील अनंत जन्मींचे । पाय त्या देवाचे न सोडावे ॥ १ ॥ न सोडावे पाय निश्चय तो करा । आळवा शारंगधरा भा-

घबळें ॥ २ ॥ धरूनी केशव आणा भावबळें । पापीयां न कळे कांहीं केल्या ॥ ३ ॥ न कळे तो देव संतसंगावांचुनी । वासना जाळुनी शुद्ध करा ॥ ४ ॥ शुद्ध करा मन देहातीत व्हावें । वस्तूंसीं ओळखावें तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६६५६ ॥ ओळखा रे वस्तू सांडा रे कल्पना । नका आडराना जाऊं ह्मणीं ॥ १ ॥ ह्मणी जाल कोठें बुडवाल हीत । विचारीं मनांत आपुलीया ॥ २ ॥ आपुलीया जीवें शिवासीं पाहावें । आत्मसुख घ्यावें वेळोवेळां ॥ ३ ॥ घ्यावें आत्मसुख स्वरूपीं मिळावें । भूतीं लीन व्हावें तुका म्हणे ॥ ४ ॥

॥ ६६५७ ॥ भुतीं लीन व्हावें सांगावें नलगेची । आतां अहंकाराची शांती करा ॥ १ ॥ शांती करा तुह्मी ममता नसावी । अंतरीं असावी भूतदया ॥ २ ॥ भूतदया ठेवा मग काय उणें । प्रथम साधन हेंचि असे ॥ ३ ॥ असो हें साधन ज्याचे चित्तीं वसे । मायाजाळ नासे तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ६६५८ ॥ मायाजाळ नासे या नामें करूनी । प्रीति चक्रपाणि असों द्यावी ॥ १ ॥ असों द्यावी प्रीति साधुच्या पायासीं । कदा कीर्तनासीं सोडूं नये ॥ २ ॥ सोडुं नये पुराण श्रवण कीर्तन । निजध्यास मनन साक्षात्कार ॥ ३ ॥ साक्षात्कार झाल्या सहज समाधी । तुका ह्मणे उपाधी गेली साची ॥ ४ ॥

॥ ६६५९ ॥ गेली साची जाणा तोचि ब्रह्म झाला । अंतरीं निवाला पूर्णपणें ॥ १ ॥ पूर्णपणें झाला राहतो कैशा रीती । साची आतां स्थिती सांगतों मी ॥ २ ॥ सांगतों तुह्मां ऐका मनोगत । राहातो मुर्खवत जगामाजी ॥ ३ ॥ जगांत पिशाच्य अंतरीं शाहाणा । सदा ब्रह्मीं जाणा निमग्न तो ॥ ४ ॥ निमग्न तो सदा जैसा मकरंद । अंतरबाह्य भेद वेगळाले ॥ ५ ॥ वेगळाले भेद किती सा असती । हृद्गत साची गती नकळे कोणा ॥ ६ ॥ नकळे कोणाला साचें हेंचि वर्म । योगी जाणे वर्म खूण साची ॥ ७ ॥ खूण साची जाणे जो तैसा असे ती । तुका म्हणे भ्रांती दुजीयाला ॥ ८ ॥

॥ ६६६० ॥ दुजीयाला भ्रांती भाविकाला शांती । साधुचिये वृत्ती लीन झाली ॥ १ ॥ लीन झाली वृत्ती ब्रम्हातें मिळाली । जळांत आटली लवण जैसें ॥ २ ॥ लवण जैसें पुन्हा जळाचे बाहेरी । येत नाहीं खरें सांतूनियां ॥ ३ ॥ त्यासारिखी तुह्मी जाणा साधुवृत्ती ॥ पुन्हा न मिळती मायाजाळीं ॥ ४ ॥ मायाजाळ त्याला पुन्हा रे बांधीना । सत्य सत्य जाणा तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६६६१ ॥ स्वर्गलोकींहुनी आले हे अभंग । धाडियेले सांग तुह्मा-लागीं ॥ १ ॥ नित्य नेमें त्यासीं पढतां प्रतापें । जळतील पापें जन्मांतरींची ॥ २ ॥ तयामागें पुढें रक्षी नारायण । मांडिल्या निर्वाण उडी घाली ॥ ३ ॥ बुद्धीचा पालट नासेल कुमती । होईल सद्गती येणें पंथें ॥ ४ ॥ सद्भक्ति झालीया सहज साक्षात्कार । होईल उद्धार पूर्वजांचा ॥ ५ ॥ साधतील येणें इहपरलोक । सत्यसत्य भाक माझी तुह्मां ॥ ६ ॥ परउपकारासाठीं सांगितलें देवा । प्रसादीक मेवा ग्रहण करा ॥ ७ ॥ येणें भवव्यथा जाईल तुमची । सख्या विठ्ठलाची आण मज ॥ ८ ॥ टाळ आणि कंथा धाडिली निशाणी । घ्यारे वोळखोनी सज्जनहो ॥ ९ ॥ माझे दंडवत तुम्हां सर्व लो-कां । देहा सहित तुका वैकुंठासी ॥ १० ॥

॥ ६६६२ ॥ सत्यसत्य जाणा त्रिवाचा नेम । अनुभव पाहा पदोपदीं ॥ १ ॥ पदोपदीं पाहा श्रीमुख चांगलें । प्रत्यक्ष पाउलें विठोबाचीं ॥ २ ॥ विठोबाची भेटी घडेल वाचितां । तुह्मालागीं आतां सांगितलें ॥ ३ ॥ सां-गितलें खरें विश्वाचिया हीता । अभंग वाचितां जे कां नर ॥ ४ ॥ ते नर पठणीं जीवन्मुक्त झाले । पुन्हां नाहीं आले संसारासीं ॥ ५ ॥ संसार उडा-ला संदेह फीटला । पूर्ण तोचि झाला तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ६६६३ ॥ पांच कोटी एक लक्षाचा शेवट । चौतीससहस्त्र स्पष्ट सांगितले ॥ १ ॥ सांगितलें हें तुका कथुनीयां गेला । बारा अभंगांला सोडूं नका ॥ २ ॥ सोडूं नका तुम्हा सांगितलें वर्म । भवपाशकर्मै चुकतील ॥ ३ ॥ चुकती यातायाती विठोबाची आण । करा हें पठण जीवेंभावें ॥ ४ ॥ जीवेंभावें करितां होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण तुका ह्मणे ॥ ५ ॥

# आख्यानें.

## ओंव्याचे अभंग.

॥ ६६६४ ॥ पहिली माझी ओवी ओवीन जगत्र । गाईन पवित्र पांडुरंग ॥ १ ॥ दुसरी माझी ओवी दुजें नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे पांडुरंग ॥ २ ॥ तिसरी माझी ओवी तिळा नाहीं ठाव । अवघाचि देव जनीं वनीं ॥ ३ ॥ चवथी माझी ओवी वैरिलें दळण । गाईन निधान पांडुरंग ॥ ४ ॥ पांचवी माझी ओवी माझिया माहेरा । गाईन निरंतरा पांडुरंगा ॥ ५ ॥ साहावी माझी ओवी माहाही आटल । गुरुमूर्ति भेटले पांडुरंगा ॥ ६ ॥ सातवी माझी ओवी आठवे वेळोवेळां । वैसलासे डोळां पांडुरंग ॥ ७ ॥ आठवी माझी ओवी अठ्ठावीस युगें । उभा चंद्रभागे पांडुरंग ॥ ८ ॥ नववी माझी ओंवी सरलें दळण । चुकलें मरण संसारींचें ॥ ९ ॥ दाहावी माझी ओवी दाहा अवतारा । न यावें संसारा तुका म्हणे ॥ १० ॥

॥ ६६६५ ॥ पांडुरंगा करूं प्रथम नमना । दुसरें चरणा संतांचिया ॥ १ ॥ साच्या कृपादानें कथेचा विस्तारु । वावाजीसद्गुरुदास तुका ॥ २ ॥ काय माझी वाणी मानेल संतांसी । रंजवूं चित्तासी आपुलिया ॥ ३ ॥ या मनासी लागो हरिनामाचा छंद । आवडी गोविंद गावयासी ॥ ४ ॥ सीण झाला मज संसारसंभ्रमें । सीतळ या नामें झाली काया ॥ ५ ॥ या सुखा उपमा नाहीं द्यावयासी । आलें आकारासी निर्विकार ॥ ६ ॥ नित्य धांवे तेथें नामाचा गजर । घोष जयजयकार आइकतां ॥ ७ ॥ तांतडी ते काय हरिगुण गाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ८ ॥ मूळ नरकाचें राज्यमदें माते । अंतरे बहुत देव दुरी ॥ ९ ॥ दुरी अंतरला नामनिंदकासी । जैसें गोचिडासी क्षीर राहे ॥ १० ॥ हे वाट गोमटी वैकुंठासी जातां । रामकृष्णकथा दिंडी ध्वजा ॥ ११ ॥ जाणते तयांनीं सांगितलें करा । अंतरासी वारा आडूनियां ॥ १२ ॥

यांसी आहे ठावें परि अंध होती । विषयाची खंती वाटे जना ॥ १३ ॥
नाहीं या सुटली द्रव्य लोभ माया । भस्म दंड छाया तरुवराची ॥ १४ ॥
चित्त त्याचें पुत्रपतिनिबंधूवरी । सुटेल हा परि कैसें जाणा ॥ १५ ॥ जाणते
नेणते करा हरिकथा । ताराल सर्वथा भाक माझी ॥ १६ ॥ माझी मज असे
घडली प्रचित । नसेल पतित ऐसा कोणी ॥ १७ ॥ कोणी तरी कांहीं केलें
आचरण । मज या कीर्तनेंविण नाहीं ॥ १८ ॥ नाहीं भय भक्ता तराया
पोटाचें । देवासी तयाचें करणें लागे ॥ १९ ॥ लागे पाठोवाटी पाहे पायां-
कडे । पीतांबरें खडे वाट झाडी ॥ २० ॥ डिंकोनियां कां रे राहिले हे
लोक । हेंचि कवतुक वाटे मज ॥ २१ ॥ जयानें तारिले पाषाण सागरीं ।
तो ध्या रे अंतरीं स्वामी माझा ॥ २२ ॥ माझिया जीवाची केली सोडवण ।
ऐसा नारायण कृपाळू हा ॥ २३ ॥ हाचि माझा नेम हाचि माझा धर्म ।
नित्य वाचे नाम विठोबाचें ॥ २४ ॥ चेतवला अग्नि तापत्रयज्वाळ । तो
करी शीतळ रामनाम ॥ २५ ॥ मना धीर करी दृढ चित्तीं धरीं । तारील
श्रीहरि मायबाप ॥ २६ ॥ बाप हा कृपाळू भक्तां भाविकांसी । घरीं होय
दासी कामारी त्या ॥ २७ ॥ त्याचा भार माथां चालवी आपुला । जिहीं
त्या दिधला सर्व भाव ॥ २८ ॥ भावेंविण जाणा नाहीं त्याची प्राप्ति । पुरा
णें बोलती ऐसी मात ॥ २९ ॥ मात त्याची जया आवडे जीवासी । तया
गर्भवासी नाहीं येणें ॥ ३० ॥ यावें गर्भवासीं तरीच विष्णुदासीं । उद्धार
लोकांसीं पूज्य होती ॥ ३१ ॥ होती आवडते जीवाचे ताइत । त्यां घडी
अच्युत न विसंबे ॥ ३२ ॥ भेदाभेद नाहीं चिंता दुःख कांहीं । वैकुंठ त्या
ठायीं सदा वसे ॥ ३३ ॥ वसे तेथें देव सदा सर्वकाळ । करिती निर्मळ नाम
घोष ॥ ३४ ॥ संपदा तयांची न सरे कल्पांतीं । मेळविला भक्तीं देवलाभ
॥ ३५ ॥ लाभ तयां झाला संसारा येऊनी । भगवंत ऋणी भक्तीं केला
॥ ३६ ॥ लागलेंसे पिसें काय मूढजनां । काय नारायणा विसरलीं ॥ ३७ ॥
विसरली तयां थोर झाली हाणी । पचविल्या खाणी चौऱ्यासीच्या ॥ ३८ ॥
शिकविलें तरी नाहीं कोणा लाज । लागलीसे भाज धन गोड ॥ ३९ ॥
गोड एक आहे अविट गोविंद । आणीक ते छंद नासिवंत ॥ ४० ॥ तळमळ
त्याची कांहीं तरी करा । कां रे निदसुरा बुडावया ॥ ४१ ॥ या जनासी भय
यमाचें कां नाहीं । सांडियेलीं तिहीं एकराज्यें ॥ ४२ ॥ जेणें अग्निमाजी
घातलासे पाव । नेणता तो राव जनक होता ॥ ४३ ॥ तान भुक जिहीं

साहिले आवात । तया पाय हात काय नाहीं ॥ ४४ ॥ नाहीं ऐसा तिहिं केला संवसार । दुःखाचे डोंगर तोडावया ॥ ४५ ॥ याच जन्में घडे देवाचें भजन । आणीक हें ज्ञान नाहीं कोठें ॥ ४६ ॥ कोठें पुढें नाहीं घ्यावया विसांवा । फिरोनि या गावां आल्याविण ॥ ४७ ॥ विनवितां दिवस बहुत लागती । ह्मणउनि चित्तीं देव धरा ॥ ४८ ॥ धरा पाय तुह्मी संतांचे जीवें-सी । वियोग तयांसी देवा नाहीं ॥ ४९ ॥ नाहीं चाड देवा आणीक सुखा-ची । आवडी नामाची साच्या तया ॥ ५० ॥ साचीच उच्छिष्ट बोलतों उ-त्तरें । सांगितलें खरें व्यासादिकीं ॥ ५१ ॥ व्यासें सांगितलें भक्ति हेंचि सार । भवसिंधुपार तरावया ॥ ५२ ॥ तरावया जना केलें भागवत । गोवळ गोपी भक्त माता पिता ॥ ५३ ॥ तारूनियां पुढें नेली एकयासरें । निमित्तें उत्तरें ऋषीचिया ॥ ५४ ॥ यासी वर्म ठावें भक्तां तारावया । जननी बाळ माया राखे तान्हें ॥ ५५ ॥ तान्हेलें भुकेलें ह्मणे वेळोवेळां । न मागतां लळा जा-णोनियां ॥ ५६ ॥ जाणोनियां वर्म देठ लावियेला । द्रौपदीच्या बोलासवें धांवे ॥ ५७ ॥ धांवे सरवता धेनु जैसी वत्सा । भक्तालागीं तैसा नारायण ॥ ५८ ॥ नारायण व्हावा हांव ज्याच्या जीवा । धन्य साच्या दैवा पार नाहीं ॥ ५९ ॥ पार नाहीं सुखा तें दिलें तयासी । अखंड वाचेसी रामनाम । ६० रामनाम दोनी उत्तम अक्षरें । भवानीशंकरें उपदेशीलीं ॥ ६१ ॥ उपदेश करी विश्वनाथ कानीं । वाराणसी प्राणी मध्यें मरे ॥ ६२ ॥ मरणाचें अंतीं राम म्हणे जरी । न लगे यमपुरी जावें तया ॥ ६३ ॥ तयासी तो ठाव केला-से वैकुंठीं । वसे नाम चित्तीं सर्वकाळ ॥ ६४ ॥ सर्वकाळ वसे वैष्णवांच्या घरीं । नसे क्षणभरी स्थिर कोठें ॥ ६५ ॥ कोठें नका पाहों करा हरिकथा । तेथें अवचिता सांपडेल ॥ ६६ ॥ सांपडे हा देव भाविकांचें हातीं । शा-हाणे मरती तरी नाहीं ॥ ६७ ॥ नाहीं भलें भक्ति केलीयावांचून । अहंता पापीणी नागवण ॥ ६८ ॥ नागवलों म्हणे देव मी आपणा । लाभ दिला जनां ठकलों तो ॥ ६९ ॥ तोचि देव येर नव्हे ऐसें कांहीं । जनार्दन ठायीं चहूं खाणी ॥ ७० ॥ खाणी भरूनियां राहिलासे आंत । बोलावया मात ठाव नाहीं ॥ ७१ ॥ ठाव नाहीं रिता कोणी देवाविण । ऐसी ते सज्जन संतवाणी ॥ ७२ ॥ वाणी बोलूनियां गेले एक पुढें । तयासी वांकुडे जातां ठके ॥ ७३ ॥ ठका नाहीं अर्थ ठाउका वेदांचा । होऊनी भेदाचा दास ठेला ॥ ७४ ॥ दास ठेला पोट अर्थ दंभासाटीं । म्हणउनि तुटी देवास-

वें ॥ ७५ ॥ सर्वें देव द्विजातीही दुराविला । आणिकाचा आला कोण पाड ॥ ७६ ॥ पाड करूनियां नागविलीं फार । पंडित वेव्हार खळवादी ॥ ७७ ॥ वादका निंदका देवाचें दर्शन । नव्हे झाला पूर्ण षडकर्मी ॥ ७८ ॥ षडकर्मी हीन रामनाम कंठीं । तयासवें भेटी सत्य देवा ॥ ७९ ॥ देवासी आवडे भाविक जो भोळा । शुद्ध त्या चांडाळा करुनि मानी ॥ ८० ॥ मानियेला नाहीं विश्वास या बोला । नाम घेतां मला युक्ति थोडी ॥ ८१ ॥ युक्ति थोडी मज दुर्बळाची वाचा । प्रताप नामाचा बोलावया ॥ ८२ ॥ बोलतां पांगल्या श्रुति नेति नेति । खुंटलीया युक्ति पुढें त्यांच्या ॥ ८३ ॥ पुढें पार त्याचा न कळेचि जातां । पाउलें देखतां ब्रह्मादिकां ॥ ८४ ॥ काय भक्तिपिसें लागलें देवासी । इच्छा ज्याची जैसी तैसा होय ॥ ८५ ॥ होय हा सगुण निर्गुण आवडी । भक्तिप्रिय गोडी फेडावया ॥ ८६ ॥ या बापासी बाळ बोले लाडें कोडें । करुनी वांकुडें मुख तैसें ॥ ८७ ॥ तैसें याचकाचें समाधानदाता । होय हा राखता सत्त्वकाळीं ॥ ८८ ॥ सत्वकाळीं कामा न येती आयुधें । बळ हा संबंध सैन्यलोक ॥ ८९ ॥ सैन्यलोक तया दाखवी प्रताप । लोटला हा कोप कोपावरी ॥ ९० ॥ कोपा मरण नाहीं शांत होय त्यासी । प्रमाण भल्यासी सत्वगुणीं ॥ ९१ ॥ सत्व-रजतम आपण नासती । करितां हे भक्ति विठोबाची ॥ ९२ ॥ चित्त रंग-लिया चैतन्यचि होय । तेथें उणें काय निजसुखा ॥ ९३ ॥ सुखाचा सागरु आहे विटेवरी । कृपादान करी तोचि एक ॥ ९४ ॥ एक चित्त धरूं विठोबाचे पायीं । तेथें उणें कांहीं एक आह्मां ॥ ९५ ॥ आह्मांसी विश्वास त्याचिया नामाचा । ह्मणउनि वाचा घोष करूं ॥ ९६ ॥ करूं हरिकथा सुखाची समाधि । आणीकाची बुद्धि दुष्ट नासे ॥ ९७ ॥ नासे संवसार लो-कमोहो माया । शरण जातां या रे विठोबासी ॥ ९८ ॥ सिकविलें मज मूढा संतजनीं । दृढ या वचनीं राहिलोंसें ॥ ९९ ॥ राहिलोंसे दृढ विठोबाचे पायीं । तुका म्हणे कांहीं न लगे आतां ॥ १०० ॥

॥ ६६६६ ॥ गाईन ओंविया पंढरीचा देव । आमुचा तो जीव पांडुरंग ॥ १ ॥ रंगलें हें चित्त माझें तया पायीं । म्हणउनि घेईं हाचि लाहो ॥ २ ॥ लाहो करीन मी हाचि संवसारीं । राम कृष्ण हरि नारायण ॥ ३ ॥ नारायण नाम घालिता तुकासी । न येती या रासी तपतीर्थें ॥ ४ ॥ तीर्थें रज माथा वंदिती संतांचे । जे गाती हरीचे गुणवाद

॥ ५ ॥ गुणवाद ज्याचे गातां पूज्य झाले । वडिवार बोले कोण त्यांचा
॥ ६ ॥ त्याचा नाहीं पार कळला वेदांसी । आणीक ही ऋषी विचारित।
॥ ७ ॥ विचारितां तैसा होय त्यांच्या भावें । निजसुख ठावें नाहीं कोणा
॥ ८ ॥ कोणा कवतुक न कळे हें मात्र । निजलिया जीव करी धंदा ॥ ९ ॥
करूनि कवतुक खेळ हाचि लीळा । व्यापूनि वेगळा पाहतसे ॥ १० ॥
सेवटीं आपण एकलाचि खरा । सोंग हा पसारा नट केला ॥ ११ ॥ लावियेलें
चाळा मीपणें हें जन । भोग तया कोण भोगविशी ॥ १२ ॥ विषयीं गुंतलीं
विसरलीं तुज । कन्या पुत्र भाजा धनलोभें ॥ १३ ॥ लोभें गिळी फांसा
आमिषाच्या आशा । सांपडोनी मासा तळमळी ॥ १४ ॥ तळमळ त्याची
तरीच शमेल । जरी हा विठ्ठल आठविती ॥ १५ ॥ आठवे हा तरी संतांच्या
सांगातें। किंवा हें संचित जन्मांतर ॥ १६॥ जन्मांतरें तीन भोगितां कळती।
केलें तें पावती करितां पुढें ॥ १७ ॥ पुढें जाणोनियां करावें संचित। पूजा-
वे अतीत देव द्विज ॥ १८ ॥ जन्म तुटे ऐसें नव्हे तुह्मां जना । पुढिल्या पा-
वना धर्म करा ॥ १९ ॥ करा जप तप अनुष्ठान याग । संतीं हा मारग स्था-
पियेला ॥२०॥ लावियेलीं कर्मे शुद्ध आचरणें । कोणा एका तेणें काळें पा-
वे ॥ २१ ॥ पावला सत्वर निष्काम उदार । जिंकिली अपार वासना हे
॥ ९९ ॥ वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । तरलोंसें कोणी न ह्मणावें ॥ २३ ॥
न ह्मणावें झाला पंडित वाचक । करूनि मंत्रघोप अक्षरांचा ॥ २४ ॥ चाळवि-
लीं एक तेचि आवडीनें । लोक दंभमानें देहसुखें ॥ २५ ॥ सुख तरीच घडे
भजनाचें सार । वाचे निरंतर रामनाम ॥ २६ ॥ राम हा उच्चार तरीच बैसे
वाचे। अनंता जन्मांचें पुण्य होय ॥ २७ ॥ पुण्य ऐसें काय रामनामापुढें ।
काय ते बापुडे यागयज्ञ ॥ २८ ॥ यागयज्ञ तप संसारदायक । न तुटती एके
नामेंविण ॥ २९ ॥ नामेंविण भवसिंधु पावे पार । अइसा विचार
नाहीं दुजा ॥ ३० ॥ जाणती हे भक्तराज महामुनि । नाम सुख धणी
अमृताची ॥ ३१ ॥ अमृताचें सार निजतत्व बीज । गुह्याचें तें
गुज रामनाम ॥ ३२ ॥ नामें असंख्यात तारिले अपार । पुराणीं हें सार
प्रसिद्ध हे ॥ ३३ ॥ हेंचि सुख आह्मी घेऊं सर्वकाळ । करूनी निर्मळ हरि-
कथा ॥ ३४ ॥ कथाकाळीं लागे सकळां समाधि। तात्काळ हे बुद्धि दुष्ट नासे
॥ ३५ ॥ नासे लोभ मोहो आशा तृष्णा माया। गातां गुण तया विठोबाचे
॥ ३६ ॥ विठोबाचे गुण मज आवडती । आणीक हे चित्तीं न लगे कांहीं

॥ ३७ ॥ कांहीं कोणी नका सांगों हे उपाव । माझ्या मनीं भाव नाहीं दुजा ॥ ३८ ॥ जाणोनियां आह्मी दिला जीवभाव । दृढ याचे पाव धरियेले॥ ३९॥ धरियेले आतां न सोडीं जीवेंसी। केला येच विशीं निरधार ॥ ४० ॥ निरधार आतां राहिलों ये नेटीं । संवसारतुटी करूनियां ॥ ४१ ॥ येणें अंगिकार केला पांडुरंगे । रंगविलों रंगें आपुलिया ॥ ४२ ॥ आपुली पाखर घालूनियां वरी । आह्मांसी तो करी यत्न देव ॥ ४३ ॥ देव राखे तया आणिकांचें काय । करितां उपाय चाले तेथें ॥ ४४ ॥ तेथें नाहीं रिघ काळिकाळासी जातां । दास ह्मणवितां विठोबाचे ॥ ४५ ॥ विठोबाचे आह्मी लाडिके डिंगर । कांपती असुर काळ धाकें ॥ ४६ ॥ धाक तिहीं लोकीं जयाचा दरारा । स्मरण हें करा त्याचें तुह्मी ॥ ४७ ॥ तुह्मी निदसुरे नका राहूं कोणी। चुकवा जाचणी गर्भवास ॥ ४८ ॥ गर्भवासदुःख यमाचें दंडण । थोर होय शीण येतां जातां ॥ ४९ ॥ तान भूक पीडा जीतां ते आघात । मेल्या यमदूत जाच करिती ॥ ५० ॥ जाच करिती हें कोणा आहे ठावें । नरकीं कौरवें बुडी दिली ॥ ५१ ॥ बुडी दिली कुंभपाकीं दुर्योधनें । दाविना लाजेनें ख धर्मा ॥ ५२ ॥ धर्म हा कृपाळू आलासे जवळी । बैसला पाताळीं वरी ये ॥ ५३ ॥ न ये वरी कांहीं करितां उपाव । भोगवितो देव ज्याचें त्यासी ॥ ५४ ॥ त्यांसी अभिमान गर्व या देहाचा । नुच्चारिती वाचा नारायण ॥५५॥ नारायण नाम विसरलीं संवसारीं। तयांसी अघोरीं वास सत्य॥५६॥ सत्य मानूनियां संतांच्या वचना । जा रे नारायणा शरण तुह्मी ॥ ५७ ॥ तुह्मी नका मानूं कोणाचा विश्वास । पुत्र पत्नी आस धन वित्त ॥ ५८ ॥ धन वित्त लोभ माया मोहपाश । मांडियेले फांसे यमदूतीं ॥ ५९ ॥ दूतीं याच्या मुखा केलेंसे कुडण । वाचे नारायण येऊं नेदी ॥ ६० ॥ नेदी शुद्धबुद्धि आतळों चित्तासी । नाना कर्में त्यासी दुरावती ॥ ६१ ॥ दुराविलीं एकें जाणतींच फार । निंदा अहंकार वादभेद ॥ ६२ ॥ वादभेद निंदा हे फंद काळाचे । गोवितील वाचे रिकामिकें ॥ ६३ ॥ रिकामिक देवा होय नव्हे मना। चिंतेचिये घाणा जुंपिजेसी ॥ ६४ ॥ सेवटीं हे गळा लावूनियां दोरी । सांभाळ ये करीं वासनेचा ॥ ६५ ॥ वासनेचा संग होय अंतकाळीं । तरी तपोबळीं जन्म धरी ॥ ६६ ॥ धरूनियां देव राहतील चित्तीं । आधींचिया गती आठवाया ॥ ६७ ॥ आठवावा देव मरणाचे काळीं। ह्मणउनि बळी जीव दिलें ॥ ६८ ॥ दिले टाकूनियां भोग ऋषेश्वरीं । खाती वनांतरीं कंदमूळें ॥ ६९ ॥ मुळें

सुखाचिया देव अंतरला । अल्पासाठीं नेला अधोगती ॥ ७० ॥ गति हे उत्तम व्हावया उपाव । आहे धरा पाव विठोबाचे ॥ ७१ ॥ विठोबाचे पायीं राहिलिया भावें । न लगे कोठें जावें वनांतरा ॥ ७२ ॥ तरती दुबळीं विठोबाच्या नांवें । संचित ज्या सवें नाहीं शुद्ध ॥ ७३ ॥ शुद्ध तरे याचें काय तें नवल । ह्मणतां विठ्ठल वेळोवेळां ॥ ७४ ॥ वेळकाळ नाहीं कव-णाचे हातीं । न कळे हे गति भविष्याची ॥ ७५ ॥ भविष्य न सुटे भोगि-ल्यावांचूनी । संचित जाणोनी शुद्ध करा ॥ ७६ ॥ करावे सायास आपुल्या हिताचे । येथें आलियाचें मनुष्यपण ॥ ७७ ॥ मनुष्यपण तरी साधी नारायण । नाहीं तरी हीन पशुहूनी ॥ ७८ ॥ पशु पाप पुण्य काय ते जाणती । मनुष्या या गति ठाउकिया ॥ ७९ ॥ ठाउकें हें असे पाप पुण्य लोकां । देखती ते एकां भोगितिशा ॥ ८० ॥ भोगतील एक दुःख संवसारीं काय सांगों परी वेगळाल्या ॥ ८१ ॥ त्यावें खावें वेरें असावें सदैव । हेचि करी हांव संवसारीं ॥ ८२ ॥ संवसारें जन गिळिलें सकळ । भोगवितो फळ गर्भवासा ॥ ८३ ॥ वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । नव्हे या खंडण गर्भ-वासा ॥ ८४ ॥ सायास केलियावांचूनि तें कांहीं । भोगावरी पाहीं घालूं नये ॥ ८५ ॥ नये दळें धड घालूं कांट्यावरी । जाये जीवें धरी सर्प हातीं ॥ ८६ ॥ हातीं आहे हित करील तयासी । ह्मणउनि ऋषीं सांगितलें ॥ ८७ ॥ सांगती या लोका फजित करूनी । आपण जे कोणी तरले ते ॥ ८८ ॥ तेणें वाळवंटीं उभारिले कर । कृपेचा सागर पांडुरंग ॥ ८९ ॥ गंगा चरणीं करी पातकांची धुनी । पाउलें तीं मनीं चिंतिलिया ॥ ९० ॥ चिंतनें जया-च्या तारिले पाषाण । उद्धरी चरण लावूनियां ॥ ९१ ॥ लावूनियां टाळी नलगे बैसावें । प्रेमसुख घ्यावें संतसंगें ॥ ९२ ॥ संतसंगें कथा करावें कीं-र्तन । सुखाचें साधन रामनाम ॥ ९३ ॥ मग कोठें देव जाऊं न सके दूरी । बैसोनी भीतरीं राहे कंठीं ॥ ९४ ॥ राहे व्यापूनियां सकळ शरीर । आपु-ला विसर पडों नेदी ॥ ९५ ॥ नेदी दुःख देखों आपुलिया दासा । वारी गर्भवासा यमदूता ॥ ९६ ॥ तान भूक त्यासी नाहीं नेदी चिंता । दुश्चित हे घेतां नाम होती ॥ ९७ ॥ होती जीव त्यांचे सकळ ही जंत । परि ते अंकित संचिताचे ॥ ९८ ॥ चेवले जे कोणी देहअभिमानें । त्यांसी नारा-यणें कृपा केली ॥ ९९ ॥ कृपाळु हा देव अनाथा कोंवसा । आह्मी त्याच्या आशा लागलोंसों ॥ १०० ॥ लावियेलें कासे येणें पांडुरंगें । तुका ह्मणे संगें संतांचिया ॥ १०१ ॥

॥ ६६६७ ॥ विचार करिती बैसोनि गौळणी। ज्या कृष्णकामिनी कामा-तुरा ॥ १ ॥ एकांत एकल्या एकात्र सुखाच्या। आवडती त्यांच्या गोष्टी त्यांला ॥ २ ॥ तर्कवितर्किणी दुराविल्या दुरी। मौन त्या परिचारी आरंभि-लें ॥ ३ ॥ कुशाळा कवित्या काथित्या लोभिका। त्याही येथें नका आह्मां-पाशीं ॥ ४ ॥ बोलक्या वाचाळा कृष्णरता नाहीं। त्यां चोरोनी तिहीं खट केली ॥ ५ ॥ भेऊनियां जना एकी सवा झाल्या। वाती विझविल्या दाटो-बळें ॥ ६ ॥ कृष्णसुख नाहीं कळलें मानसीं। निंदिती त्या त्यासी कृष्णर-ता ॥ ७ ॥ तो नये जवळी देखोनी कोल्हाळ। ह्मणउनि समेळ मेळविला ॥ ८ ॥ अंतरीं कोमळा बाहेरी निर्मळा। तल्लीन त्या बाळा कृष्णध्यानीं ॥ ९ ॥ हरिरूपीं वृष्टि कानीं त्याच गोष्टी। आळंगिती कंठीं एका एकी ॥ १० ॥ न साहे वियोग करिती रोदना। श्रमिष्ट भावना देहाचिया ॥ ११ ॥ विसरल्या मागें गृह सुत पती। अवस्था याचिती गोविंदाची ॥ १२ ॥ अव-स्था लागोनी निवळचि ठेल्या। एका एकी झाल्या कृष्णरूपा ॥ १३ ॥ कृष्ण ह्मणोनियां देती आलिंगन। विरहताप तेणें निवारेना ॥ १४ ॥ ताप कोण वारी गोविंदावांचूनी। साच तो नयनीं न देखतां ॥ १५ ॥ न देखतां यांचा प्राण रिघों पाहे। आजी कामास ये उसिर केला ॥ १६ ॥ रित्या ज्ञानगोष्टी तयां नावडती। आलिंगण प्रीति कृष्णाचिया ॥ १७ ॥ मागें कांहीं आह्मी चुकलों त्याची सेवा। असेल या देवा राग आला ॥ १८ ॥ आठविती मागें पापपुण्यदोष। परिहार एकीस एक देती ॥ १९ ॥ अनुतापें झाल्या संतप्त त्या बाळा। टाकूनि विव्हळा धरणी अंग ॥ २० ॥ जाणोनी चरित्र जवळीच होता। आली त्या अनंता कृपा मग ॥ २१ ॥ होऊनी प्रगट दाखविलें रूप। तापत्रय ताप निवविले ॥ २२ ॥ निवालेया देखोनी कृष्णाचें श्रीमुख। शोक मोह दुःख दुरावला ॥ २३ ॥ साच भाव त्यांचा आणूनियां मना। आळंगिला राणा वैकुंठींचा ॥ २४ ॥ हरिअंगसंगें हरिरूप झाल्या। बोलों विसरल्या तया सुखा ॥ २५ ॥ व्यभिचारभावें भोगिलें अनंता। वर्तोनी असतां घराचारी ॥ २६ ॥ सकळा चोरोनी हरि जयां चित्तीं। धन्य त्या नांदती तयामध्यें ॥ २७ ॥ उणें पुरें त्यांचें पडों नेदी कांहीं। राखे सर्वां ठायीं देव तयां ॥ २८ ॥ न कळे लाघव ब्रह्मादिकां माव। भक्तिभावें देव केला तैसा ॥ २९ ॥ तुका ह्मणे त्यांचा धन्य व्यभिचार। साधिलें अपार निजसुख ॥ ३० ॥

## बाळक्रीडा.

॥ ६६६८ ॥ देवा आदिदेवा जगत्रयजीवा । परियेसी केशवा विनंती माझी ॥ १ ॥ माझी वाणी तुझे वर्णी गुण नाम । ऐसें देई प्रेम कांहीं कळा ॥ २ ॥ कळा तुजपाशीं आमुचें जीवन । उचित करून देई आह्मां ॥ ३ ॥ आह्मां शरणागतां तुझाचि आधार । तूं तंव सागर कृपासिंधु ॥ ४ ॥ सिंधु पायवाट होय तुझ्या नामें । जाळी महाकर्में दुस्तरें तीं ॥ ५ ॥ तीं फळें उत्तमें तुझा निजध्यास । नाहीं गर्भवास सेविलिया ॥ ६ ॥ सेविलिया रामकृष्ण नारायण । नाहीं त्या बंधन संसाराचें ॥ ७ ॥ संसार तें काय तृणवतमय । अग्नि त्यासी खाय क्षणमात्रें ॥ ८ ॥ क्षणमात्रें जाळी दोषांचिया रासी । निंद्य उत्तमासी वंद्य करी ॥ ९ ॥ करीं ब्रीद साच आपलें आपण । पतितपावन दीनानाथ ॥ १० ॥ नाथ अनाथाचा पति गोपिकांचा । पुरवी चित्तींचा मनोरथ ॥ ११ ॥ चित्तीं जें धरावें तुका ह्मणे दासीं । पुरविता होसी मनोरथ ॥ १२ ॥

॥ ६६६९ ॥ मनोरथ जैसे गोकुळींच्या जना। पुरवावी वासना तयापरी ॥ १ ॥ रिण फेडावया अवतार केला । अविनाश आला आकारासी ॥ २ ॥ सीण झाला वसुदेवदेवकीस । वधी बाळें कंस दुराचारी ॥ ३ ॥ दुराचारियासी नाहीं भूतदया । आप पर तया पाप पुण्य ॥ ४ ॥ पुण्यकाळ त्याचा राहिलासे उभा । देवकीच्या गर्भा देव आले ॥ ५ ॥ गर्भासी तयांच्या आला नारायण । तुटलें बंधन आपेआप ॥ ६ ॥ आपेआप बेड्या तुटल्या शृंखळा। बंदाच्या आर्गळा किलिया कोंडे ॥ ७ ॥ कोंडमार केला होता बहु दिस । सोडवी निमिष नलगतां ॥ ८ ॥ न कळे तो त्यासी सांगितला भाव । आपणासी ठाव नंदाघरीं ॥ ९ ॥ नंदाघरीं जातां येतां वसुदेवा । नाहीं झाला गोवा सर्वें देव ॥ १० ॥ सर्वें देव तया आड नये कांहीं । तुका ह्मणे नाहीं भय चिंता ॥ ११ ॥

॥ ६६७० ॥ चिंता ते पळाली गोकुळाबाहेरी । प्रवेश भीतरी केला देवें ॥ १ ॥ देव आला घरा नंदाचिया गांवा । धन्य त्याच्या दैवा दैव आलें ॥ २ ॥ आलें अविनाश धरूनी आकार । दैत्याचा संहार करावया ॥ ३ ॥ करावया भक्तजनाचें पाळण । आले रामकृष्ण गोकुळासी ॥ ४ ॥ गोकुळीं आनंद प्रगटलें सुख । निर्भर हे लोक घरोघरीं ॥ ५ ॥ घरोघरीं झाला ल-

क्षमीचा वास । दैन्यदारिद्र्यास त्रास आला ॥ ६ ॥ आला नारायण तयां-च्या अंतरा । दया क्षमा नरा नारीलोकां ॥ ७ ॥ लोकां गोकुळींच्या झालें ब्रह्मज्ञान । केलियावांचून जपतपें ॥ ८ ॥ जपतपें काय करावीं साधनें । जंव नारायणें कृपा केली ॥ ९ ॥ केलीं नारायणें आपुलीं अंकित । तोचि त्यांचें हित सर्व जाणे ॥ १० ॥ सर्व जाणे एक विष्णु साच खरा । आणि-क दुसरा नाहीं नाहीं ॥ ११ ॥ नाहीं भक्ता दुजें तिहीं त्रिभुवनीं । एका चक्रपाणीवांचूनियां ॥ १२ ॥ याच्या सुखसंगें घेती गर्भवास । तुका ह्मणे आस सजूनियां ॥ १३ ॥

॥ ६६७१ ॥ यांच्या पूर्वपुण्या कोण लेखा करी । जिहीं तो मुरारी खे-ळविला ॥ १ ॥ खेळविला जिहीं अंतर्बाह्यसुखें । मेळवूनि मुखें चुंबन दिलें ॥ २ ॥ दिलें त्यांसी सुख अंतरींचें देवें । जिहीं एका भावें जाणितला ॥ ३ ॥ जाणितला तिहीं कामातुर नारी । कृष्णभोगावरी चित्त ज्यांचें ॥ ४ ॥ ज्याचें कृष्णीं तन मन झालें रत । गृह पति सुत विसरल्या ॥ ५ ॥ विष तयां झालें धन मान जन । वसविती वन एकांतीं त्या ॥ ६ ॥ एकांतीं त्या जाती हरीसी घेऊनी । भोगइच्छाधणी फेडावया ॥ ७ ॥ वयाच्या संपन्ना तैसा त्यांकारणें । अंतरींचा देणें इच्छाभोग ॥ ८ ॥ भोग त्याग नाहीं दो-न्ही जयापासी । तुका ह्मणे जैसी स्फटिकशिळा ॥ ९ ॥

॥ ६६७२ ॥ शिळा स्फटिकाची न पालटे भेदें । दाऊनियां छंदें जैसी तैसी ॥ १ ॥ जैसा केला तैसा होय क्षणक्षणा । फेडावी वासना भक्तिभावें ॥ २ ॥ फेडावया आला अवघियांची धणी । गोपाळ गौळणी मायबापा ॥ ३ ॥ मायबापा सोडविलें बंदीहूनी । चाणूर मर्दुनी कंसादिक ॥ ४ ॥ दिक नाहीं देणें अरिमित्रा एक । पूतना कंटक मुक्त केली ॥ ५ ॥ मुक्त केला मामा कंस महादोषी । बाळहत्या रासी पातकांच्या ॥ ६ ॥ पाप कोठें राहे हरी आठवितां । भक्ति द्वेषें चिंता जैसा तैसा ॥ ७ ॥ साक्षी तयापाशीं पूर्वील कर्मांच्या । बांधला सेवेच्या ऋणें देव ॥ ८ ॥ देव भोळा धांवें भक्ता पाठोपाठीं । उच्चारितां कंठीं मागें मागें ॥ ९ ॥ मानाचा कंटाळा तुका ह्मणे त्यासी । धांवे तो घरासी भाविकांच्या ॥ ४० ॥

॥ ६६७३ ॥ चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । बांधवी तो हातीं गौळणींच्या ॥ १ ॥ गौळणिया गळा बांधिती धारणीं । पायां चक्रपाणी लागे तया ॥ २ ॥ तयाघरीं रिघे चोरावया लोणी । रितें पाळतूनी शिरे

माजी ॥ ३ ॥ माजी शिरोनियां नवनीत खाय । कवाड तें आहे जैसें तैसें ॥ ४ ॥ जैसा तैसा आहे अंतर्बाह्यात्कारीं । ह्मणउनि चोरी न सांपडे ॥ ५ ॥ न सांपडे तयां करितां खटपट । वाउगे बोभाट वर्मा विण ॥ ६ ॥ वर्म जाणती सा एकल्या एकटा । वैसतील वाटा निरोधूनी ॥ ७ ॥ निवांत राहिल्या निःसंग होऊनी । निश्चळ ज्या ध्यानीं कृष्णध्यान ॥ ८ ॥ न ये क्षणभरी योगियांचे ध्यानीं । धरिती गौळणी भाविका सा ॥ ९ ॥ भाविका तयांसी येतो काकुलती । शाहाण्या मरती न सांपडे ॥ १० ॥ नलगे वेचावी टोली धनानांवें । तुका ह्मणे भावें चाड एका ॥ ११ ॥

॥ ६६७४ ॥ चाड अनन्याची धरी नारायण । आपणासमान करी रंक ॥ १ ॥ रंक होती राजे यमाचिये घरीं । आचरणें बरीं नाहीं म्हूण ॥ २ ॥ न सांपडे इंद्रचंद्र ब्रह्मादिकां । अभिमानें एका तिळमात्रें ॥ ३ ॥ तिळमात्र जरी होय अभिमान । मेरु तो समान भार देवा ॥ ४ ॥ भार पृथिवीचा वाहिला सकळ । जड होती खळ दुष्ट लोक ॥ ५ ॥ दुष्ट अभक्त जे निष्ठुर मानसीं । केली हे तयांसी यमपुरी ॥ ६ ॥ यमदूत त्यांसी करिती यातना । नाहीं नारायणा भजले जे ॥ ७ ॥ जे नाहीं भजले एका भावें हरी । तयां दंड करी यमधर्म ॥ ८ ॥ यमधर्म म्हणे तयां दोषियांसी । कां रे केशवासी चुकलेती ॥ ९ ॥ चुकलेती कथा पुराणश्रवण । होते तुम्हां कान डोळे मुख ॥ १० ॥ कान डोळे मुख संतांची संगति । न धराच चित्तीं सांगितलें ॥ ११ ॥ सांगितलें संतीं तुम्हां उगवूनी । गर्भासी येऊनी यमदंड ॥ १२ ॥ दंडूं आह्मीं रागें ह्मणे यमधर्म । देवा होय श्रम दुर्जनाचा ॥ १३ ॥ दुर्जनाचा येणें करूनी संहार । पूर्वअवतार रामकृष्ण ॥ १४ ॥ रामकृष्णनामें रंगले जे नर । तुका ह्मणे घर वैकुंठीं त्यां ॥ १५ ॥

॥ ६६७५ ॥ वैकुंठींच्या लोकां दुर्लभ हरिजन । तया नारायण समागमें ॥ १ ॥ समागम त्यांचा धरिला अनंतें । जिहीं चित्तवित्त समर्पिलें ॥ २ ॥ समर्थ तीं गाती हरीचे पवाडे । येर ते बापुडे रावराणे ॥ ३ ॥ रामकृष्णें केलें कौतुक गोकुळीं । गोपाळांचे मेळीं गाई चारी ॥ ४ ॥ गाई चारी मोहोरी पांवा वाहे पाठीं । धन्य जाळी काठी कांबळी ते ॥ ५ ॥ काय गौळियांच्या होत्या पुण्यरासी । आणीक त्या ह्मैसी गाई पशु ॥ ६ ॥ सुख तें असुप लुटिलें सकळीं । गोपिका गोपाळीं धणीवरी ॥ ७ ॥ धणीवरी त्यांसीं सांगितली माती । जयाचें जें आर्त तयापरी ॥ ८ ॥ परी यांचे तुह्मी

आइका नवल । दुर्गमे जो खोल साधनासी ॥ ९ ॥ शिक लावूनियां घालिती बाहेरी । पाहाती भीतरी सर्वेचि तो ॥ १० ॥ तोंडाकडे त्यांच्या पाहे कवतुकें । शिव्या देतां सुखें हांसतसे ॥ ११ ॥ हांसतसे शिव्या देतां त्या गौळणी । मरतां जपध्यानीं न बोले तो ॥ १२ ॥ तो जें जें करिल तें दिसे उत्तम । तुका ह्मणे वर्म दावी सोपें ॥ १३ ॥

॥ ६६७६ ॥ वर्म दावी सोपें भाविकां गोपाळां । वाहे त्यांच्या गळां पाले माळा ॥ १ ॥ मान देती आधीं मागतील डाव । देवा तें गौरव माने सुख ॥ २ ॥ मानती ते मंत्र हमामा हुंबरी । सिंतोडिती वरी स्नान तेणें ॥ ३ ॥ वस्त्रें घोंगडिया घालूनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ४ ॥ तिहीं लोकांसी जो दुर्लभ चिंतना । तो धांवे गोधना वळतियां ॥ ५ ॥ त्यांच्या वचनाचीं पुष्पें वाहे शिरीं । नैवेद्य त्यांकरीं कवळ मागे ॥ ६ ॥ त्यांचिये मुखींचें हिरोनियां घ्यावें । उच्छिष्ट तें खावें धणीवरी ॥ ७ ॥ वरी माथां गुंफे मोरपिसांवेटी । नाचे टाळी पिटी त्यांच्या छंदें ॥ ८ ॥ छंदें नाचतील जयासवें हरी । देहभाव वरी विसरलीं ॥ ९ ॥ विसरलीं वरी देहाची भावना । तेचि नारायणा सर्वपूजा ॥ १० ॥ पूजा भाविकांची न कळतां घ्यावी । न मागतां दावी निज ठाव ॥ ११ ॥ ठाव पावावया हिंडे मागें मागें । तुका ह्मणे संगें भक्तांचिया ॥ १२ ॥

॥ ६६७७ ॥ भक्तजनां दिलें निजसुख देवें । गोपिका त्या भावें आळंगिल्या ॥ १ ॥ आळंगिल्या गोपी गुणवंता नारी । त्यांच्या जन्मांतरीं हरि ऋणी ॥ २ ॥ रुसलिया त्यांचें करी समाधान । करविता आपण क्रिया करी ॥ ३ ॥ क्रिया करी तुह्मां न वजे पासूनी । अवघिया जणी गोपिकांसी ॥ ४ ॥ गोपिकांसी ह्मणे वैकुंठींचा पति । तुह्मी माझ्या चित्तीं सर्वभावें ॥ ५ ॥ भाव जैसा माझ्या ठायीं तुह्मी धरा । तैसाचि मी खरा तुह्मांलागीं ॥ ६ ॥ तुह्मां कळों द्या हा माझा साच भाव । तुमचाचि जीव तुह्मां ग्वाही ॥ ७ ॥ ग्वाही तुह्मां आह्मां असे नारायण । आपलीच आण वाहतसे ॥ ८ ॥ सत्य बोले देव भक्तिभाव जैसा । अनुभवें रसा आणूनियां ॥ ९ ॥ यांसी बुझाविते वेगळाल्या भावें । एकीचें हें ठावें नाहीं एकी ॥ १० ॥ एकी क्रिया नाहीं अवघियांचा भाव । पृथक हा देव घेतो तैसें ॥ ११ ॥ तैसें कळों नेदी जो मी कोठें नाहीं । अवघियांचे ठायीं जैसा तैसा ॥ १२ ॥ जैसा मनोरथ जये चित्तीं काम । तैसा मेघश्याम पुरवितो ॥ १३ ॥ पुरविले मनोरथ